# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.04.2025** **वार- मंगळवार**

---

•राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मुंबईत, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्ती सोहळ्याला उपस्थित राहणार,

· विकसित भारताचं लक्ष्य गाठण्यासाठी सागरी व्यापार क्षेत्राचा समग्र विकास आवश्यक असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन,

· औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही – मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती,

· रमजान ईदचा सण राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मुंबई दौऱ्यावर आहेत. काल संध्याकाळी त्यांचं मुंबईत आगमन झालं. आज भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्ती सोहळ्याच्या सांगता समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रिझर्व्ह बँकेनं वर्षभर देशभरातील नागरिकांसाठी आर्थिक साक्षरतेबाबतचे विविध उपक्रम आयोजित केले होते.

**<u>राज्यपाल</u>**

जगातील ९० टक्के  व्यापार आजही सागरी मार्गाने होतो. समुद्र मार्गाने होणारा व्यापार हा भारतीय व्यापार तसंच अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचं लक्ष्य गाठण्यासाठी सागरी व्यापार क्षेत्राचा समग्र विकास होणं अतिशय आवश्यक आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे.

सागरी व्यापार क्षेत्रातर्फे साजरा केल्या जाणाऱ्या ६२व्या राष्ट्रीय सागरी दिवसाचं तसंच मर्चंट नेव्ही सप्ताहाचं उद्घाटन काल राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>फडणवीस गणित</u>**

नागपूर इथल्या भारती कृष्ण विद्या विहार इथं वैदिक गणिताचं गुणवत्ता केंद्र उभारण्यासाठी शासनातर्फे सर्वतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. आद्य शंकराचार्य कृष्णतीर्थ महाराज लिखित वैदिक गणिताच्या दोन खंडांचं प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत काल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते झालं, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. वैदिक गणिताची महती आणि उपयोग येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहचण गरजेचं आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. प्राचीन भारतीय परंपरेतून आलेल्या वैदिक गणिताचा विचार हा विश्व कल्याणासाठी आहे. जगात अध्यात्मावर आधारित घडत असलेल्या विविध परिवर्तन आणि पुनर्रचनेमध्ये वैदिक गणितही महत्वाची भूमिका पार पाडू शकते, असा विश्वास मोहन भागवत यांनी व्यक्त केला.

**<u>फडणवीस पत्रकार परिषद</u>**

“मुगल शासक औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही” , असं स्पष्ट प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरात केलं. ते

प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. दरम्यान, औरंगजेबाचा मुद्दा नाहक उपस्थित केला जात असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी औरंगजेबाच्या कबरीविषयी केलेल्या टिपणीबद्दल प्रतिक्रिया देताना ते काल नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. औरंगजेब इथंच मरण पावला, त्यामुळे त्याची कबर इथं आहे आणि ती तिथेच राहील, ज्याची श्रद्धा आहे तो कबरीला भेट देईल, असं जोशी म्हणाले.

**<u>राम शिंदे</u>**

सोलापूर विद्यापीठाच्या जमिनीसंदर्भातील प्रश्न येत्या पंधरा दिवसात मार्गी लावू, अशी ग्वाही विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी दिली आहे. ते काल सोलापूर इथं एका कार्यक्रमात बोलत होते. विद्यापीठाच्या ४७२ एकर जमिनीपैकी बरीचशी जमीन वनविभागकडे असल्याने विद्यापीठाचा विकास रखडला असल्याची खंत कुलगुरु डॉक्टर प्रकाश महानवर यांनी व्यक्त केली होती. त्यावर वन, कृषी तसंच उच्च तंत्रशिक्षण विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची आणि मंत्र्यांची संयुक्तिक बैठक घेऊन विद्यापीठाचा हा प्रश्न ३१ मे पूर्वी मार्गी लावू, असं शिंदे यांनी सांगितलं.

**<u>इंट्रोबाईट</u>**

**<u>अहिराणी साहित्य संमेलन</u>**

बोली मणि अहिराणी; जसं दही मानं लोणी; हे बोधवाक्य घेऊन, अंमळनेरमध्ये गेले दोन दिवस अहिराणी साहित्य संमेलन भरवण्यात आलं होतं. अहिराणी शब्दकोश निर्माण करणारे डॉक्टर रमेश सूर्यवंशी या संमेलनाचे अध्यक्ष होते. अहिराणी सेवक साथी गुलाबराव पाटील साहित्य नगरीमध्ये आयोजित या पाचव्या अहिराणी साहित्य संमेलनाचं ग्रंथदिंडी, परिसंवाद, तसंच अहिराणी कवि-संमेलन, कथा-कथन, एकपात्री प्रयोगही सादर करण्यात आले. या संमेलनाला रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

संमेलनात संमत झालेल्या विविध ठरावांबाबत संमेलनाचे मुख्य संयोजक प्राध्यापक डॉक्टर लीलाधार पाटील यांनी आकाशवणीला अधिक माहिती दिली.---------

**<u>बाईट - लीलाधार पाटील</u>**

**<u>ईद</u>**

ईद ऊल फित्र अर्थात रमजान ईद काल देशभर उत्साहात साजरी करण्यात आली. पवित्र रमजान महिन्यानंतर येणाऱ्या या सणानिमित्त काल ठिकठिकाणच्या मशिदी आणि ईदगाहमध्ये सामूहिक नमाज अदा करण्यात आली. मुस्लीम बांधवांनी एकमेकांना भेटून शुभेच्छा, मिठाई आणि भेटवस्तू देत ईदचा आनंद साजरा केला. राज्यात मुंबई पुण्यासह सर्वत्र ईदचा उत्साह होता

पुणे सोलापूर रस्त्यावरील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिमधर्मीय नागरिकांनी सामूहिक नमाज अदा केली. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबाचं फुल देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

**<u>वेव्ज</u>**

मुंबई होणाऱ्या वेव्ह परिषदेच्या दरम्यान वेव्हज बाजाराचंही आयोजन केलं जाणार आहे. यात चित्रपट, टीव्ही, Animation, VFX, Gaming, and Comics या क्षेत्रातले दिग्गज भाग घेणार आहेत. यात भागिदारी, व्यवसाय विस्तार यासारख्या गोष्टींवर चर्चा होईल. त्यासाठी प्रक्षेपण व्यवस्था, खरेदीदार – विक्रेते यांच्यात बैठकी, आंतर-देशीय भागिदारीसाठी व्यवस्था उपलब्ध असेल. www.wavesbazaar.com या संकेतस्थळावर याविषयी अधिक माहिती उपलब्ध आहे.

**विखेपाटील**

शिर्डी औद्योगिक वसाहतीत होणाऱ्या डिफेन्स क्लस्टर प्रकल्पामुळे जिल्ह्याच्या लौकिकात भर पडणार असल्याचा विश्वास राज्याचे जलसंपदा मंत्री आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला आहे. सावळीविहीर खुर्द इथं डिफेन्स क्लस्टरअंतर्गत निबे ऑर्डनन्स ग्लोबल लिमिटेड कंपनीच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. या क्लस्टरमुळे शिर्डी परिसराच्या औद्योगिक विकासाला चालना मिळून रोजगारात वाढ होईल, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला.

**नाईट लँडींग**

दरम्यान, शिर्डी इथल्या श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळावर रात्रीच्या वेळी विमान उतरवण्याच्या अर्थात नाईट लँडींग सेवेचा प्रारंभ गुढी पाडाव्याच्या मुहूर्तावर  करण्यात आला. इंडिगो कंपनीच्या विमानानं यावेळी यशस्वी लँडिंग केलं. कंपनीचे अधिकारी आणि माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यावेळी उपस्थित होते.

**आरोपी अटक**

बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातल्या अर्धमसला इथं प्रार्थनास्थळात स्फोट घडवून आणल्याप्रकरणी विजय गव्हाणे आणि श्रीराम सागडे या दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना विशेष न्यायालयानं ३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, दहशतवाद विरोधी पथक आता या प्रकरणाचा समांतर तपास करणार आहे.

**विनावाहक सेवा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानं प्रवाशांना खासगी वाहतुकीपेक्षा अधिक दर्जेदार सुविधा द्याव्यात, असं प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या

विविध आगारासाठी प्राप्त झालेल्या नवीन ४५ राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांचं लोकार्पण आणि अहिल्यानगर-पुणे विनावाहक बस सेवेचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते काल तारकपूर बस स्थानक इथं करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं कोलकाता नाइट रायडर्सवर 8 गडी आणि 43 चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला.

त्यापूर्वी मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. आणि कोलकाता नाइट रायडर्स संघाला 17 व्या षटकात ११६ धावांवर सर्वबाद केलं. 117 धावांच हे लक्ष्य मुंबईने केवळ दोन गड्याच्या मोबदल्यात १3व्या षटकातच पूर्ण केल. रायन रुकेलटन यांनं ४१ चेंडूत ६२ धावा तर सुर्यकुमार यादवनं ९ चेंडूत २७ धावा करत विजयी भागिदारी केली.  आज लखनौ सुपर जायंटसचा सामना पंजाब किंग्जबरोबर लखनौ इथं खेळाला जाईल.

**<u>उष्णता</u>**

देशात यंदा एप्रिल ते जून हा कालावधी नेहमीपेक्षा जास्त उष्ण राहण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. हवामानशास्त्र विभागाचे प्रमुख मृत्युंजय मोहपात्रा यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरयाणा, पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओदिशा, छत्तीसगढ, तेलंगण आणि आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये तसंच कर्नाटक आणि तमिळनाडूच्या उत्तर भागात ही स्थिती राहील. असंही त्यांनी सांगितलं.

**<u>हवामान -</u>**

दरम्यान राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात पुढील चार दिवस पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. या काळात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी गारपिटीची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**